**कृपया प्रसिद्धीसाठी** **10 ऑक्टोबर 2011**

## दिवाळीसाठी जनतेला सरकारने स्वस्तात साखर, तेल, रवा द्यावे : राम नाईक

**मुंबई, सोमवार:**''महागाईने मेटाकुटीला आलेल्या जनतेला सरकारने दिवाळीसाठी शिधावाटप दुकानांमध्ये स्वस्तात साखर, तेल, रवा उपलब्ध करुन द्यावे. खरं तर दर वर्षीच सणासुदीला ज्यादा साखर, तेल,रवा दिले जाते. परंतु यंदा अजूनही सरकारने याची घोषणाही केलेली नाही. या सरकारच्या गरीबी रेषेच्या व्याख्येप्रमाणे दररोज रु. 32 म्हणजे दरमहा रु.1000/- पेक्षा जास्त उत्पन्न असलेले सर्व सामान्य 'श्रीमंत' आहेत. या सामान्यांनी आता दिवाळी कशी साजरी करायची?'' असा सवाल माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी केला. भाजपा उत्तर मुंबई अल्पसंख्यक मोर्चाद्वारे मालवणी येथे आयोजित महागाई विरोधी सभेत रविवारी श्री. नाईक बोलत होते.

''काँग्रेस सरकारच्या नाकर्तेपणामुळेच महागाई वाढते आहे. काँग्रेसचा कारभार असा विचित्र आहे की मोटार गाडीला लागणा-या पेट्रोलपेक्षा विमानाचे इंधन रु. 13.47 ने स्वस्त आहे. आता जनतेनेच जागृत होऊन महागाईविरुद्ध लढा देण्याची गरज आहे'', असे प्रतिपादन यावेळी श्री. नाईक यांनी केले आहे.

भाजपा, मुंबईचे माजी अध्यक्ष व आमदार श्री. गोपाळ शेट्टी यावेळी बोलताना म्हणाले, ''एका बाजूला महागाई गगनाला भिडली आहे, तर दुसरीकडे भ्रष्टाचाराचा राक्षस अधिकाधिक विक्राळ होतो आहे. साधी झोपडी दुरुस्त करायची असेल तरी गरीबाला काँग्रेसच्या नगरसेवकाला लाच द्यावी लागते, अशी परिस्थिती आहे.'' भाजपा महाराष्ट्र अल्पसंख्यक मोर्चाचे अध्यक्ष श्री. हैदर आझमही या सभेला उपस्थित होते. श्री. आझम यांनी आपल्या अल्पसंख्यक बांधवांना आवाहन केले की काँग्रेसच देशाच्या दुर्दशेला कारणीभूत आहे हे लक्षात घेऊन काँग्रेसच्या आहारी जाऊ नका. सभेचे आयोजक व भाजपा उत्तर मुंबई अल्पसंख्यक मोर्चाचे अध्यक्ष श्री. जाहीद खान यांनी महागाईला जबाबदार काँग्रेसला येत्या महापालिका निवडणुकीत धडा शिकवूया असे उपस्थितांना आवाहन केले.

भाजपाचे अन्य स्थानिक नेते सर्वश्री जयप्रकाश ठाकुर, इफ्तेखार हुसैन, योगेश वर्मा, राजेश सिंह, दिनेश जैन, इकबाल अंजुम, आजम मनिहार यांच्यासह शेकडो नागरिक या महागाई विरोधी सभेत सामील झाले होते. अनेक अल्पसंख्यकांनी या सभेत भाजपामध्ये प्रवेश केला.

**(कार्यालय सचिव)**